MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

CIN No. U40109MH2005SGC153646

# महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड


**अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय**

५०० किव्हो उदादिधा ग्रहण केंद्र (संवसु) मंडल, पडघे-४२१ १०१, ता. भिवंडी, जि. ठाणे (महाराष्ट्र राज्य)

दुरध्वनी क्र. : ९७६९००६१९१ (कार्या), नियंत्रण कक्ष : ९७६९००६१७३ / २३० / २३१

E-mail: se7300@mahatransco.in Web. www.mahatransco.in


क्र. अअ/उदादिधा/पडघे/स्था. No 0 1 5 2 7 दिनांक : 14 OCT 2024

**विषय :-** सुशिक्षीत बेरोजगार (स्थापत्य) अभियंता यांना लॉटरी पध्दतीने कामे वाटप करण्यासंबंधी प्रथम लॉटरी (सन २०२४-२५) बैठक दि. २३.१०.२०२४ (बुधवार) ला घेणेबाबत.

**संदर्भ :-**
१. I, E&L Dept. GOM Gr No. Misc.-2015/CR-63/Energy-5 Dtd.26.03.2015.
२. MSETCL/CO/Tr. O&M/SE-II/EE-VIII/12883 Dtd. 05.12.2016
३. C.O.Letter vide No. 1046 Dtd. 25.01.2018.

सुशिक्षीत बेरोजगार (स्थापत्य) अभियंता यांना थेट लॉटरी पध्दतीने कामे वाटपाची योजना महाराष्ट्र शासनाच्या निर्णय संदर्भ क्र. (१) अन्वये अधीन राहून महापारेषण कंपनीने संदर्भ क्र. (२) अन्वये लागू केली आहे.

सदरील नोटीस ही दि. १५.१०.२०२४ रोजी प्रसिध्दीस देण्यात येत असून प्रसिध्दीच्या दिनांकापासून २२.१०.२०२४ पर्यंत महापारेषण कंपनीच्या संकेत स्थळावर तसेच उ.दा.दि.धा. ग्रकें संवसु मंडळ, पडघे या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्दिस्तव उपलब्ध असेल.

या योजनेच्या अंतर्गत अधिक्षक अभियता, उ.दा.दि.धा. ग्रके संवसु मंडळ, पडघे या कार्यालयात दि. २३.१०.२०२४ रोजी सायंकाळी १६.३० वाजता खालील कामांसाठी खालील नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम लॉटरी (२०२४-२५) बैठक आयोजित करण्यात आली आहे.

सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना वाटप करण्यात येणारी कामे :-

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (सर्व करांसहीत) | जिल्हा |
|---|---|---|---|
| १. | Work of "External painting and allied minor works at RTC Padghe building at HVDC premises Padghe." | रू. ०८,११,६९१.००/- | ठाणे |
| २. | Work of "Renovation of toilet block at circle office at HVDC Padghe." | रू. ०५,४३,५४६.००/- | ठाणे |
| ३. | Work of "Repair and extension of parking shed near 400kV control room at HVDC Padghe." | रू. ०३,४२,३४५.९३/- | ठाणे |

**अटी व शर्ती :-**

१. सुशिक्षीत बेरोजगार (स्थापत्य) अभियंता प्रतिनिधींनी लॉटरीसाठी उपस्थित राहतांना खालील तपशील सोबत आणणे बंधनकारक आहे.
   अ. महाराष्ट्र शासनाची वैध अनुज्ञाती/बेरोजगार सहकारी संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
   ब. सर्व शासकीय/ निमशासकीय/खाजगी आस्थापनेमध्ये एकूण केलेल्या व चालू असलेल्या कामाचा तपशील.
   क. रहिवाशी प्रमाणपत्र व सर्व मुळ कागदपत्रे/संस्थेची घटना (By laws copy)

२. संबंधित अधिक्षक अभियंता यांच्या कार्यक्षेत्रात रहिवासी असलेल्या बेरोजगार अभियंत्यास लॉटरीमध्ये सहभाग घेता येईल. कार्यक्षेत्राबाहेरील बेरोजगार अभियंता तसेच सुशिक्षीत बेरोजगार सहकारी संस्थेस लॉटरीमध्ये सहभाग घेऊ शकणार नाही.

३. ही सवलत अभियांत्रिकी पदवी/ पदविका उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासुन १० वर्षाच्या आत नोंदणी केलेल्या सुशिक्षीत बेरोजगार (स्थापत्य)अभियंत्याना लागू होईल. लॉटरी पध्दतीने कामे वाटपाच्या वेळेस सदर (स्थापत्य)अभियंता हा सुशिक्षीत बेरोजगार असावा, तसेच तो कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेत नसावा. उपस्थित असलेल्या सुशिक्षीत बेरोजगार स्थापत्य /विद्युत अभियंत्याने दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास त्याला महापारेषण कंपनीने प्रदान केलेला नोंदणीकृत परवाना रद्द करण्यात येईल, तसेच महापारेषण कंपनीने या योजनेअंतर्गत काढलेल्या पुढील कोणत्याही लॉटरी प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही व सदर अभियंत्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**या लॉटरी प्रक्रियेने कामे मिळवण्यासाठी -**

- सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांनी कामे घेण्याच्या दिवशीच्या ते सुशिक्षीत बेरोजगार असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या सेवायोजना कार्यालयाचे प्रमाणपत्र आणणे बंधनकारक आहे.

४. या लॉटरी प्रक्रियेसाठी अधिक्षक अभियंता, उ.दा.दि.धा.ग्रकें संवसु मंडळ, पडघे या कार्यालयात दि. २२.१०.२०२४, १८.०० पर्यंत नोंदणी झालेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील.

सदर लॉटरी बैठक दि. २३.१०.२०२४ रोजी सायंकाळी १६.३० वाजता, ५०० किव्हो उ.दा.दि.धा. ग्रहण केंद्र संवसु मंडळ, पडघे, ता.भिवंडी, जि.ठाणे पिनकोड ४२११०१ या कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. वरील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणा-या वैध सुशिक्षीत बेरोजगार (स्थापत्य) अभियंत्यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी नियोजित वेळेस कागदपत्रांच्या सत्य प्रतीसोबत या कार्यालयात उपस्थित राहावे.

अधिक्षक अभियंता,
उ.दा.दि.धा. ग्रकें संवसु मंडळ, पडघे.

**प्रत सादर :-**

१. कार्यकारी अभियंता(प्र), उ.दा.दि.धा. ग्रकें संवसु मंडळ, पडघे (सदस्य)
२. अति.कार्यकारी अभियंता (प्र), उदादिधा स्थापत्य विभाग, पडघे.
३. व्यवस्थापक (वि.व.ले), उ.दा.दि.धा. संवसु मंडळ, पडघे.
४. सुचना फलक.

वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या समिती सदस्यांसोबत नियोजित वेळेत या कार्यालयात उपस्थित राहावे.